# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/२०२५ दि. २७ फेब्रुवारी, २०२५

जळगाव दि.२७ ( प्रतिनिधी)  कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभाग, राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि सामाजिकशास्त्रे प्रशाळा यांच्या संयुक्तविद्यमाने संविधान गौरव महोत्सवाच्या निमित्ताने संविधानभान : काळाची गरज या विषयावर व्याख्यान संपन्न झाले.

सामाजिकशास्त्र प्रशाळेत व्याख्यान कार्यक्रमास वक्ते म्हणुन डॉ.विजय घोरपडे तर मंचावर विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ.जयेंद्र लेकुरवाळे व रासेयो संचालक डॉ.सचिन नांद्रे उपस्थित होते.या प्रसंगी डॉ.घोरपडे यांनी सांगितले की, भारतीय संविधान हे प्रत्येक भारतीय नागरिकांच्या जगण्याचा अविभाज्य भाग बनले पाहिजे. आपली लोकशाही  अधिक सुदृढ आणि बळकट होण्यासाठी शेवटच्या घटकांपर्यंत संविधानिक मुल्य रुजवणे गरजेचे आहे.

डॉ.लेकुरवाळे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, भारतीय संविधान हे जगातील सर्वश्रेष्ठ संविधान असून त्याचे श्रेय डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना जाते. डॉ.नांद्रे यांनी संविधान जनजागृती विषयक आवश्यकता आपलया भाषणातून स्पष्ट केली. यावेळी संविधान प्रास्ताविकेचे सामुहिक वाचन करण्यात आले. या कार्यक्रमास रासेयो एकक कार्यक्रम अधिकारी डॉ. कैलास दांडगे, डॉ. उमेश गोगडीया, डॉ. अभय मनसरे, श्रीशंकर यशोद, अजय महाले व तथागत सुरवाडे यांची उपस्थिती होती. सुत्रसंचालन डॉ.मनोज इंगोले यांनी  तर आभार डॉ. कविता पाटील यांनी मानले.

बातमी क्र. २

जळगाव दि.२७ ( प्रतिनिधी)  सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात झालेल्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या राज्यस्तरीय सामाजिक व सांस्कृतिक  उत्कर्ष स्पर्धेत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाला उत्कृष्ट कार्य भित्तीचित्र आणि उत्कृष्ट कार्यप्रगती अहवालात पहिल्या क्रमांकाचा चषक प्राप्त झाला.

दि. २३ ते २५ फेब्रुवारी या कालावधीत ही स्पर्धा झाली. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा १९ विद्यार्थ्यांचा संघ स्पर्धेत सहभागी झाला होता. उत्कृष्ट कार्य भित्तीचित्र फिरता चषक प्रथम क्रमांक आणि उत्कृष्ट कार्यप्रगती अहवाल फिरता चषक प्रथम क्रमांकाचा मानकरी हा संघ ठरला. कुलगुरू प्रा.व्ही.एल.माहेश्वरी, प्र.कुलगुरू प्रा.एस.टी.इंगळे, कुलसचिव डॉ.विनोद पाटील, रासेयो संचालक डॉ.सचिन नांद्रे, कक्ष अधिकारी शरद पाटील आदींनी संघाचे अभिनंदन केले.

--------------------------------------------------------------------------------------------------------

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनंसपर्क अधिकारी